क्र.प्रतिनि/गट-(अ व ब)/१२८/प्रशा-२/ २२४८
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१
दिनांक : ८ सप्टेंबर, २०१७

विषय : चांदा ते बांदा प्रकल्पाची अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील प्रकल्प संचालक व प्रकल्प व्यवस्थापक (मूल्यमापन) ही पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ : १. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक:डिएपी-२०१६/प्र.क्र.१८६/का.१४८१, दि.१८/११/२०१६
२. नियोजन विभागाचे संचालनालयास निर्देशित पत्र क्रमांक:निविआ १०१७/प्र.क्र.१९७/१४२१, दिनांक २३/८/२०१७ व त्यासोबतचे समक्रमांकाचे दिनांक २३/८/२०१७ चे मागणीपत्र.

परिपत्रक

नियोजन विभागाच्या संदर्भ क्रमांक १ समोरील शासन निर्णयान्वये चंद्रपूर व सिंधुदूर्ग या जिल्हयातील नैसर्गिक साधन संपत्तीचा इष्टतम वापर करण्याकरीता शासनाने सुरु केलेल्या चांदा ते बांदा या योजनेची प्रभावी अंमलबाजवणीसाठी मंत्रालयीन स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील प्रकल्प संचालक (वेतनबँड रु.१५६००-३९१००, ग्रेड वेतन ६६००/७६००), प्रकल्प व्यवस्थापक (मूल्यमापन) (वेतनबँड रु.१५६००-३९१००, ग्रेड वेतन ५४००/६६००) ही पदे गट-अ संवर्गामधील अधिका-यांमधून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने भरावयाची असल्याबाबत नियोजन विभागाच्या संदर्भ क्रमांक २ समोरील पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२/- तेव्हा संचालनालयाच्या गट-अ (राजपत्रित) संवर्गावरील सर्व अधिका-यांना विचारणा करण्यात येते की, ते चांदा ते बांदा या योजनेअंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्षामधील सदरील प्रतिनियुक्तीच्या पदावर जाण्यास इच्छुक आहेत किंवा कसे याबाबत संचालनालयास हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत कळवावे. विहित कालावधीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नसल्याने याबाबत कृपया दक्षता घ्यावी.

आपला,

(संजय काळे)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

सहपत्र:वरिलप्रमाणे

प्रति,
संचालनालयाच्या गट-अ, राजपत्रित संवर्गावरील सर्व अधिकारी

क्रमांक : निविआ १०१७/प्र.क्र.१९७/१४२१

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१७

२९४७
२८/८/१७

प्रति,

१) सह / उप सचिव,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई.

३) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

विषय : चांदा ते बांधा प्रकल्पाची अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत......

संदर्भ : १) समक्रमांकाचे दिनांक ०६ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्र
२) अ) आपले पत्र क्रमांक : प्रतिनि ३०१६/६५४/आस्था-१, दिनांक ५ मे, २०१७
ब) आपले पत्र क्रमांक : प्रतिनि/गट-(अ व ब)/१२८/प्रशा-२/६८५ दिनांक ५ मे, २०१७

महोदय / महोदया,

चंद्रपूर व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील नैसर्गिक सांधन संपत्तीचा इष्टतम वापर करण्याकरीता शासनाने सुरू केलेल्या चांदा ते बांधा या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी मंत्रालयीन स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील "प्रकल्प संचालक" व "प्रकल्प व्यवस्थापक(मूल्यमापन)" ही पदे गट-अ मधील अधिकाऱ्यांमधून (ग्रेड वेतन अनुक्रमे रु.७६००/६६०० व रु.५४००/६६००) एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत. प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठीचे मागणीपत्र सोबत जोडले आहे. आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्त कार्यालयातील गट-अ मधील प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छुक असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती या विभागास कृपया पाठविण्यात यावी. प्रतिनियुक्तीसाठी करावयाचा अर्जाचा नमुना तसेच प्रशासकीय विभाग / संवर्ग नियंत्रण विभागाने भरावयाचा तपशीलाचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. प्रतिनियुक्तीने जाऊ इच्छिनाऱ्या अधिकाऱ्यांचे प्राप्त झालेले अर्ज संबंधित प्रशासकीय विभागीय स्तरावर / संवर्ग नियंत्रण विभागामार्फत तपासण्यात यावेत व सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील माहिती भरून ते या विभागाकडे पाठविण्यात यावेत अशी आपणास विनंती आहे.

आपली,

(प्रज्ञा महाले)
उप सचिव, नियोजन विभाग

मा. संचालक
अपर संचालक (.../.../इआसांके)
सह संचालक (.../.../.../पुसंअ/.........)
उप संचालक (.../............)

प्रत,
उप सचिव, कार्या.१४२७, नियोजन विभाग, मंत्रालय
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

F:PAT State Project Management Committee Tippni

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
क्रमांक : निविआ १०१७/प्र.क्र.१९७/१४२१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
सहावा मजला (विस्तार इमारत), मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २३ ऑगस्ट, २०१७

**प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांचे मागणीपत्र**

चंद्रपूर व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर करण्याकरीता चांदा ते बांदा ही योजना राबविण्यास शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : डिएपी १०१५/प्र.क्र.५१/१४८१, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : डिएपी १०१६/प्र.क्र.१८६/१४८१, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये मंत्रालयीन स्तरावर राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हे दोनही शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील "प्रकल्प संचालक" व "प्रकल्प व्यवस्थापक" (मूल्यमापन) ही अनुक्रमे गट-अ व गट-ब दर्जाची पदे एक वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

२. या पदांची वेतन संरचना, अनुभव, कोणत्या संवर्गातून उमेदवारांची प्रतिनियुक्ती अपेक्षित आहे, कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहे :-

| पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या | वेतन संरचना | पात्रता | खालील संवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प संचालक | मुंबई-१ | रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६००/ ७६०० | किमान १५ वर्षे शासकीय सेवा व अशा प्रकारचे प्रकल्प हाताळण्याचा पाच वर्षांचा अनुभव | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी /<br>उप आयुक्त अर्थ व सांख्यिकी संचालनालय/<br>मंत्रालयातील उप सचिव (गट-अ) | प्रकल्पाचे राज्य स्तरावरून कार्यान्वयन करणे.<br>विविध प्रशासकीय विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याशी समन्वय साधणे.<br>कार्यक्रमाचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे.<br>कार्यक्रमाची सुयोग्य अंमलबजावणी करणे.<br>कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता योग्य ती कार्यप्रणाली विकसित करणे.<br>कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेणे तसेच संनियंत्रण व मूल्यमापन करणे.<br>विविध संस्थांशी भगीदारी करणे.<br>राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री (नियोजन) यांना तसेंच अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांना रिपोर्टिंग करणे.<br>राज्यात दौरा करून कार्यक्रम अंमलबजावणीची प्रत्यक्ष पाहणी करणे.<br>विविध stakeholders करिता प्रशिक्षण आयोजित करणे. |

| पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या | वेतन संरचना | पात्रता | खालील संवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| प्रकल्प व्यवस्थापक (मूल्यमापन) | मुंबई-१ | रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० / ६६०० | किमान दहा वर्षे शासकीय सेवा. अशा प्रकारचे प्रकल्प हाताळण्याचा तीन वर्षांचा अनुभव | महाराष्ट्र विकास सेवा (म.वि.से.) / अर्थ व सांख्यिकी विभागातील (गट-अ चे) अधिकारी | कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये सहाय्य करणे.<br>अंमलबजावणी यंत्रणा तसेंच जिल्हा व्यवस्थापन कक्षास तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देणे.<br>कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता विविध stakeholders सोबत समन्वय राखणे.<br>कार्यक्रम संनियंत्रण व मूल्यमापनाचे निदेशक (Indicators) निश्चित करणे.<br>MIS प्रणाली विकसित करणे.<br>कार्यक्रमांचे योग्य मूल्यमापन करण्याच्यादृष्टीने दौरे करणे.<br>दरमहा कार्यक्रम अंमलबजावणीबाबत अहवाल तयार करून सादर करणे.<br>प्रकल्प संचालकांनी वेळोवेळी दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे. |

३. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: एक वर्षासाठी राहील. तदनंतर आवश्यकता विचारांत घेऊन संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रक अधिकाऱ्याच्या संमतीने हा कालावधी जास्तीत-जास्त पांच वर्षे इतका वाढविता येईल.

४. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संबंधित संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

५. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात भरून, परिपूर्ण अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत पाठवावेत.

६. प्रशासकीय विभागांनी / संवर्ग नियंत्रक विभागांनी, प्रतिनियुक्ती संबंधीच्या नवीन धोरणाच्या अंमलबजावणी संबंधातील परिशिष्ट-ड मधील सूचनेंनुसार आवश्यक माहिती भरून, परिपूर्ण स्वरुपातील अर्ज आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधित अधिकाऱ्यांच्या मागील पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतीसह दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत उप सचिव (का.१४२१), नियोजन विभाग, सहावा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

(प्रज्ञा महाले)
उप सचिव, नियोजन विभाग
दुरध्वनी क्रमांक २२७९३६३९

प्रति,

१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग
३) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
४) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई

त्यांनी विनंती करण्यात येते की, सदरचे मागणीपत्र त्यांनी या विभागाच्या संकेत स्थळावर व मंत्रालयीन इन्ट्रानेटवर कृपया प्रसिद्ध करावे.